# बृहन्मुंबई महानगरपालिका



## भीमा तुम्हा वंदना...

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त
बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन !!

जनसंपर्क विभाग

वर्ष - २०२४

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या नागरी सेवा-सुविधा

१) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) मंडप आणि व्ही. आय. पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.

२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणा प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्गासह ११ ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.

३) १ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा.

४) मैदान व परिसरात तसेच रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी फिरती शौचालये.

५) छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) आणि चैत्यभूमी परिसरात महिलांकरिता पिंक टॉयलेटची व्यवस्था.

६) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) पिण्याच्या पाण्यासाठी आरओ वॉटर प्युरिफायरची व्यवस्था.

७) पिण्याच्या पाण्याच्या नळांची व्यवस्था, रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याचे पाण्याचे टँकर्स.

८) कर्मचारी व वाहतूक व्यवस्थेमार्फत संपूर्ण परिसरात स्वच्छता.

९) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था आणि मोबाईल चार्जिंगकरिता व्यवस्था.

१०) अग्निशमन दलामार्फत आवश्यक त्या सेवांसह चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर जीव रक्षकांसहीत बोटीची व्यवस्था.

११) चैत्यभूमी स्मारकातील आदरांजली कार्यक्रमाचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.

१२) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) स्टॉल्सची रचना.

१३) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्खू निवासाची व्यवस्था.

१४) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरिता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.

१५) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरिता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.

१६) तात्पुरत्या स्नानगृहांची व फायबरच्या तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था.

१७) इंदू मिलच्या मागे फायबरची शौचालये व स्नानगृहे आदी व्यवस्था.

१८) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी बाकड्यांची सोय.

१९) महिला व नवजात बालकांकरिता चैत्यभूमी व छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) येथे हिरकणी कक्षाची सुविधा.

२०) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.

२१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा आणि जी दक्षिण विभागात माता रमाई भीमराव आंबेडकर पुतळा परिसरात शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय कक्ष आदी व्यवस्था.

२२) दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि दादर (पूर्व) स्वामीनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष, माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.

२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान असणाऱ्या 'राजगृह' येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.

२४) 'एल' विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथे नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

२५) 'एम' पश्चिम विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, चेंबूर येथे आवश्यक ती व्यवस्था.

★ **वरील सर्व व्यवस्थांमधील सांख्यिकी आकडेवारी प्रस्तावित / नियोजित आहे.**

- **चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.**
- **चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.**

महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीचे प्रक्षेपण पाहण्यासाठी खाली दर्शविलेला 'क्यूआर कोड' किंवा 'समाज माध्यमांचा' (सोशल मीडिया) कृपया उपयोग करावा.


ही पुस्तिका डाऊनलोड करण्यासाठी खालील 'क्यूआर कोड' स्कॅन करा.

mybmcmymumbai


mybmc

mybmc


# बाबासाहेबांचे तीन गुरू



तथागत गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

" माझे आयुष्य तीन गुरू आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरू 'बुद्ध' होत. माझे दुसरे गुरू 'कबीर' आणि तिसरे गुरू म्हणजे 'जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत. पहिले दैवत 'विद्या', दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय'' (मुंबई, १९५४).

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# आंबेडकरी साहित्य, कला प्रवाहाचे जनक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न , परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मी विनम्र अभिवादन करतो.

जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेल्या भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अवघे जग ओळखते. या महामानवाच्या स्मारकाला चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी महापरिनिर्वाण दिनी लाखो अनुयायी देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत येतात. त्यांना लागणाऱ्या मूलभूत नागरी सेवा-सुविधा पुरविण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिका दरवर्षी नेमाने करते. ही व्यवस्था उभी करण्याचे नियोजन यंदा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक या दोन्ही नात्याने मला करता आले, हे मी माझे भाग्य समजतो. कारण आपल्या प्रशासकीय कर्तव्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आगळीवेगळी आदरांजली अर्पण करता आली, अशी माझी त्यामागील भावना आहे.

एवढेच नव्हे तर, चैत्यभूमीवर येणाऱ्या लक्षावधी अनुयायांसाठी सेवा-सुविधा पुरविताना बृहन्मुंबई महानगरपालिका किती सूक्ष्म नियोजन करते, शासन आणि इतर यंत्रणांच्या समवेत समन्वय साधून सर्व कार्यवाही कशी अथक पार पाडली जाते, या सर्वांचा मला यानिमित्ताने जवळून अनुभव घेता आला आहे. ही बाब कायम माझ्या स्मरणात राहील. कारण प्रशासकीय सेवेत अशा कामकाजाचे नियोजन करण्याची संधी मोजक्याच लोकांना लाभते.

महापरिनिर्वाण दिनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका करीत असलेल्या तयारीमध्ये माहिती पुस्तिकेचा देखील वाटा असतो. वेगवेगळ्या व्यवस्था व उपाययोजना या नियमित बाबींची माहिती देण्यापलीकडे ही पुस्तिका वाचनीय व संग्राह्य होण्यासाठी मागील चार-पाच वर्षांपासून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी निगडित विशिष्ट संकल्पना प्रतिवर्षी निश्चित करुन त्यावर आधारित माहिती, छायाचित्रे इत्यादींची विशेष माहिती या पुस्तिकेच्या माध्यमातून सादर केली जाते.

यंदादेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, जीवनकार्य, कर्तृत्व यावर आधारलेली विशेषतः अभिवादनाची गीतं ही संकल्पना नजरेसमोर ठेवून ही पुस्तिका सादर करण्यात येत आहे. या संकल्पनेला अनुरुप आणि फार कमी वेळा आपणा सर्वांच्या पाहण्यात आले असेल असे डॉ. बाबासाहेब हे व्हायोलिन वादन करीत असतानाचे समर्पक छायाचित्र मुखपृष्ठ म्हणून निवडण्यात आले आहे.

आंबेडकरी गीतं ही संकल्पना देखील विचारपूर्वक निवडण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण होवून आता ६८ वर्षे झाली आहेत. असे असताना, आजही त्यांचे जीवन, विचार, कार्यकर्तृत्व यापासून प्रेरणा घेवून आयुष्यात पुढे सरसावत असलेल्यांची, संघर्ष करणाऱ्यांची, समाजकार्यात झोकून देणाऱ्यांची कमी नाही. यामध्ये समाजातील सर्व स्तरातील वर्गाचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, विचार, कार्य यांची ज्योत पिढ्यान् पिढ्या तेवत ठेवून ती लक्षावधी लोकांपर्यंत पोहोचविण्यात चळवळीची भूमिका जितकी महत्त्वाची राहिली आहे, तितकीच महत्त्वाची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आधारित वाङ्मय, साहित्य यांची देखील राहिली आहे. त्यातूनच तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोण होते, ते कसे घडले, त्यांचा संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी संपादीत केलेले यश आणि समाजासाठी मागे सोडलेला वारसा हे सर्व पुढच्या पिढीला कळले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाची, कार्याची व्याप्ती अतिशय मोठी आहे. त्याकाळी संवाद, प्रचार, प्रसार यासाठी आजच्यासारखी तंत्रज्ञान आधारित प्रगत साधने नव्हती. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महती आणि विचार हे भीमगीते, जलसा, शाहीरी यांच्या माध्यमातून व्यापक स्वरुपात पुढे आली.

अवघ्या काही मिनिटांच्या गीतांमधून, रचनांमधून, भारावून टाकण्याची ताकद त्यात होती. ही ताकद इतकी विलक्षण होती की त्यातून अनेक प्रतिभावंत शाहीर, गीतकार, साहित्यिक महाराष्ट्राला आणि देशालाही लाभले. साहित्याच्या क्षेत्रात नवीन वाटा तयार करणारी पिढीच त्यातून जन्माला आली. या साहित्य प्रवाहाच्या प्रारंभापासूनचा परामर्श घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने देखील 'दलित कवितेचे अर्धशतक' या शीर्षकाखाली नोव्हेंबर २०१८ मध्ये ग्रंथ प्रकाशित केला आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कला आणि साहित्य यांची देखील आवड जोपासली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची थोरवी अनेक ज्ञात-अज्ञात साहित्यिक, कलावंत, कवी-गीतकारांनी आपल्या शब्दांतून मांडली आहे. त्यासाठी असंख्य गीते, कादंबरी आणि पुस्तकांचे लेखन झाले. हे सर्व साहित्य आजही पुढच्या पिढीला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरते आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असे महामानव आहेत की, ज्यांच्या हयातीत आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही त्यांच्यावर जी काव्यं लिहिली गेली, त्याची मोजदाद करता येत नाही. हाच धागा पकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित निवडक गीतांचा समावेश असलेली माहिती पुस्तिका यंदा प्रकाशित केली आहे.

महाराष्ट्राला जशी संतांची, विचारवंतांची, समाजसुधारकांची, प्रबोधनकारांची मोठी परंपरा लाभली आहे, तशीच शाहीर, गायक आणि गीतकारांचीही परंपरा लाभली आहे. गीतकारांनी आणि शाहिरांनी आपल्या विविध रचनांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला आहे. त्यांनी आपल्या स्वरांजलीतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पायाभरणी केली आहे. दस्तुरखुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरदेखील म्हणत की, "माझी दहा भाषणं आणि शाहिराचं एक गाणं बरोबरीचं आहे." हीच त्यावेळच्या गीतकारांसाठी, शाहिरांसाठी बाबासाहेबांकडून मिळालेली पोचपावती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः उत्तम वाचक, गाढे अभ्यासक होते. तसेच ते विविध कलांचेही दर्दी होते. त्यांच्यातील हा सुप्त गुण त्यांचे लेखन वाचताना सर्वसामान्य वाचकाच्या सहज ध्यानी येतो. गीत, काव्य यांची देखील त्यांना आवड होती. यातूनच पुढे त्यांनी चक्क वयाच्या साठाव्या वर्षी व्हायोलिन शिकण्याचा निर्धार केला. नुसता निर्धार करून ते थांबले नाहीत, तर पुढील दोन वर्षात त्यांनी हा निर्धार वास्तवात उतरवला. ते सहजरित्या व्हायोलिन वादन करु लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयात असताना त्यांनी कलावंतांना कलेची जोपासना करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळेच सर्व स्तरातील कलावंताच्या लेखणीला, कलेला एक व्यासपीठ खुले झाले. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतरही अनेक कलावंतांनी आंबेडकरी विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा वसा जपला आहे. यातूनच पुढे पुरोगामी महाराष्ट्रात आंबेडकरी साहित्याचा अभ्यास करणारा मोठा वर्गही पुढे आला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या महामानवास विनम्र अभिवादन करताना दिवंगत कवी सुरेश भट यांच्या ओळी आठवतात. 'तू उभा सूर्यापरी, राहिली कोठे निशा ? एवढे आम्हा कळे, ही तुझी आहे दिशा ! मायबापा, घे उद्याच्या अंकुरांची वंदना !'

साहित्य, वाङ्मय, गीत, काव्य असो की आणखी काही, या सर्वांमधून डॉ. बाबासाहेबांचे विचार समाजाला चिरंतन प्रेरणा आणि योग्य दिशा देत राहतील!

या महामानवास शतशः नमन!

**भूषण गगराणी**
महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१८९१ : महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).
१९०७ : मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.
१९०८ : रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
१९१० : ईन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
१९१२ : बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१९१३ : वडील सुभेदार रामजी यांचे निधन (२फेब्रुवारी).
१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती प्रदान केली (१ जून).
१९१३ : उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्कला (अमेरिका) रवाना.
१९१५ : 'एन्शिएंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधासह एम. ए. ची पदवी उत्तीर्ण.
१९१६ : 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया : अ हिस्टॉरिकल अँड ॲनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.
१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.
१९१८ : सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).
१९२० : राजर्षी शाहू महाराज यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जाने.)
१९२० : माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद (१ मार्च).
१९२० : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद,नागपूर(१मे).
१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
१९२३ : 'डॉक्टर ऑफ सायन्स'ची पदवी बहाल.
१९२४ : 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई (२० जुलै).
१९२६ : 'राजरत्न' या मुलाचे निधन (जुलै).
१९२७ : कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद,महाड(१९ मार्च).
१९२७ : 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन (३ एप्रिल).
१९२७ : मुंबई विधीमंडळात सदस्य म्हणून निवड.
१९२७ : 'समाज समता संघ' ची स्थापना (४ सप्टेंबर).
१९२७ : डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन (१२ नोव्हेंबर).
१९२७ : अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह (१३ नोव्हेंबर).
१९२७ : महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर).
१९२८ : मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक (जून).
१९२८ : 'समता' पाक्षिकाचा आरंभ (२९ जून).
१९२८ : 'सायमन कमिशन' पुढे साक्ष (२३ ऑक्टोबर).
१९२९ : अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधीमंडळात भाषण.
१९३० : काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ (३ मार्च).
१९३० : लंडन येथे आयोजित गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना (२ ऑक्टोबर).
१९३० : गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली (नोव्हेंबर).
१९३० : 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ (२४ नोव्हेंबर).
१९३१ : मणिभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट (१४ ऑगस्ट).
१९३१ : अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध (८ ऑक्टोबर).
१९३१ : गांधी-आंबेडकर-पंचम जॉर्ज यांची भेट (२६ नोव्हेंबर).
१९३२ : पुणे करारावर स्वाक्षरी (२४ सप्टेंबर).
१९३५ : पत्नी रमाबाई यांचे निधन (२७ मे).
१९३५ : मुंबई विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती (२ जून).
१९३५ : "मी जरी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही!" येवला येथे धर्मांतराची घोषणा (१३ ऑक्टोबर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१९३६ : 'जातीप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित (मे).
१९३६ : 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई (३१ मे).
१९३६ : स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना (१५ ऑगस्ट).
१९३७ : मुंबई असेंब्ली निवडणुकीत विजय (१७ फेब्रुवारी ).
१९३७ : कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरिता मुंबई विधीमंडळात विधेयक मांडले (१७ सप्टेंबर).
१९३८ : पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण (४ जानेवारी).
१९३८ : मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (१२-१३ फेब्रुवारी ).
१९३८ : मुंबई विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा राजीनामा (मे).
१९३८ : औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधीमंडळात मांडले (सप्टेंबर).
१९३८ : स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह (७ नोव्हेंबर).
१९३९ : महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद - काँग्रेसच्या शेतकरीविरोधी धोरणावर टीका (जानेवारी).
१९४० : सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट, मुंबई (२२ जून).
१९४० : 'थॉटस् ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
१९४२ : अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना (एप्रिल).
१९४२ : भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर (१९ जुलै).
१९४२ : मजूर मंत्री म्हणून निवड.
१९४३ : पुणे येथे विख्यात भाषण; 'रानडे, गांधी आणि जिन्ना' (१९ जानेवारी).
१९४५ : 'काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले' ग्रंथ प्रकाशित (जून ).
१९४६ : मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (२० जून).
१९४६ : 'शूद्र पूर्वी कोण होते ?' हा ग्रंथ प्रकाशित.
१९४६ : भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण (१७ डिसेंबर ).
१९४७ : भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश (ऑगस्ट ).
१९४७ : संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती (२९ ऑगस्ट ).
१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह (१५ एप्रिल).
१९४८ : 'दि अनटचेबल्स्' ग्रंथ प्रकाशित (ऑक्टोबर).
१९४८ : राज्यघटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला (४ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण (२५ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीने राज्यघटना स्वीकार केली (२६ नोव्हेंबर).
१९५० : 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध (मे).
१९५० : कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित (२५ मे).
१९५० : छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन (१९ जून ).
१९५१ : लोकप्रतिनिधीत्व विधेयक लोकसभेपुढे मांडले (मे ).
१९५१ : 'हिंदूस्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (सप्टेंबर).
१९५१ : हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रीपरिषदेचा राजीनामा (२७ सप्टेंबर).
१९५२ : प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव (जानेवारी).
१९५२ : राज्यसभेसाठी निवड (मार्च ).
१९५२ : कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी बहाल (५ जून ).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१९५३ : उस्मानिया विद्यापीठातर्फे ( हैदराबाद), 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी बहाल (१२ जानेवारी ).

१९५४ : 'महात्मा फुले' या चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित (३० जानेवारी).

१९५४ : भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव (मे).

१९५४ : आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण (३ ऑक्टोबर).

१९५४ : माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले (२८ ऑक्टोबर ).

१९५४ : रंगून येथील तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित (डिसेंबर).

१९५५ : भारतीय बौद्ध महासभा स्थापित (४ मे ).

१९५६ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली (४ फेब्रुवारी).

१९५६ : 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा नरे पार्क, मुंबई येथे केली (२४ मे).

१९५६ : नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसमवेत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली (१४ ऑक्टोबर).

१९५६ : 'बौद्ध धम्म का स्वीकारला' याविषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे सायंकाळी मानपत्र अर्पण (१५ ऑक्टोबर).

१९५६ : चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बांधवांना धम्मदीक्षा दिली (१६ ऑक्टोबर).

१९५६ : काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' या विषयावर अभूतपूर्व भाषण (२० नोव्हेंबर).

१९५६ : दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (०६ डिसेंबर ).

१९५६ : मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार (७ डिसेंबर).




परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, चैत्यभूमी (दादर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २२ प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारू पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इत:पर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.



मुंबईच्या हिंदू कॉलनीतील 'राजगृह' निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कुटुंबीय.
डावीकडून यशवंत (मुलगा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पत्नी रमाबाई आंबेडकर,
वहिनी लक्ष्मीबाई (आनंदराव यांच्या पत्नी), मुकुंदराव (पुतण्या) आणि त्यांचा आवडता श्वान टॉबी.
राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेब्रुवारी १९३४ मध्ये राहण्यास आले.

**"माझी दहा भाषणं आणि शाहिराचं एक गाणं बरोबरीचं आहे."**

**-डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरही अनेक ज्ञात-अज्ञात सहित्यिक, कवी-गीतकारांनी आपल्या शब्दांतून, गीतांमधून आंबेडकरी विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा वसा जपला आहे. यातूनच पुरोगामी महाराष्ट्रात आंबेडकरी साहित्याचा अभ्यास करणारा मोठा वर्गही पुढे आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, जीवनकार्य, कर्तृत्व यावर आधारलेली काही आंबेडकरी विशेषत: अभिवादनाची गीते आपल्यासमोर सादर.....

# उद्धरली कोटी कुळे

उद्धरली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे ।। धृ ।।

एक ज्ञानज्योतीने कोटी, कोटी ज्योती
तळपतात तेजाने तुझ्या धरेवरती
अंधार दूर तो पळे भीमा तुझ्या जन्मामुळे ।।१।।

जखडबंद पायातील साखळदंड
तटातट तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे ।।२।।

कुजे वृक्ष तैसाच होता समाज
हिरवी हिरवी पाने अन् तयालाच आज
अमृताची आली फळे, भीमा तुझ्या जन्मामुळे ।।३।।

काल कवडीमोल जिणे वामनचे होते
आज जुळे जगताशी प्रेमाचे नाते
बुद्धाकडे जग हे वळे, भीमा तुझ्या जन्मामुळे ।।४।।

गीतकार : वामन कर्डक

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# भीमस्तुती

दिव्य प्रभरत्न तू, साधू वरदान तू
आद्य कुलभूषण तू, भीमराजा ।

सकल विद्यापति, ज्ञान सतसंगति,
शास्त्र शासनमति, बुद्धितेजा ।

पंकजा नरवरा, रत्त स्वजन उद्धारा
भगवंत आमुचा खरा, भक्त काजा ।

चवदार संगरी, शस्त्र धरिता करी
कापला अरि उरी, रौद्ररूपा ।

मुक्तिपथ कोणता, जीर्ण स्मृती जाळिता
उजाळिला अगतिका मार्ग साजा ।

राष्ट्रघटना कृती शोभते भारती
महामानव बोलती, सार्थ संज्ञा ।

शरण बुद्धास ये, शरण धम्मास ये
शरण संघास ये, मानवा ।

गीतकार : वि. तु. जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# जग बदल घालूनी घाव

जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत
अंग झाडूनी निघे बाहेरी । घे बिनीवरती घाव ।।

धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले ।
मगराने जणू माणिक गिळले । चोर जाहले साव ।।

ठरवून आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करुनी अंकीत ।
जिणे लादूनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ।।

एकजुटीच्या या रथावरती । आरुढ होऊनी चलबा पुढती ।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती । करी प्रकट निज नाव ।।

गीतकार : अण्णा भाऊ साठे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# भीमा तुझ्या मताचे

भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते
भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते.. ।। धृ ।।

वाणीत भीम आहे, करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे, सारेच चोख असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.. ।। १ ।।

गोळी खुशाल घाला, फाशी खुशाल द्यारे
खोटे इथे खऱ्याचे, दुसरेच टोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.. ।। २ ।।

तत्वाची जाण असती बिनडोक लोक नसते
सारे चलन तयांचे, ते रोख ठोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.. ।। ३ ।।

सद्भाव एकतेचे, जर अंतरात असते
फुटले कुणीच नसते, सारेच एक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.. ।। ४ ।।

वामन समान सारे, स्वार्थाने अंध नसते
तुझीया नीतीप्रमाणे सारेच नेक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.. ।। ५ ।।

गीतकार : वामन कर्डक

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# अत्त दीप भव

दया धर्म शांतीच्या पथाचा पथिक तुझा तूच हो
तू स्वयंदीप हो अत्त दिप भव स्वयंदीप हो ।। धृ ।।

कोसळोत वर्षा उठू दे झंकारात
आसूड विजेचे घेऊन आम्ही शाप
दावू दे दिशांना करूनिया आकांत
परी निश्चल असू दे ज्योत तुझ्या हातात
तू अविश्रांत सामर्थ्य उरी हो ।। १ ।।

मानव्य जगण्या हो तू मानव आधी
तेवता जळू दे आसक्तीची व्याधी
बोधिसत्त्व फुलू दे तुझिया हातावरती
निथळू दे तयातून सिद्धार्थाची नीती
तू कळ्या-फुलांतील कोमलता सुगंध आनंद हो ।। २ ।।

तू जळणारांचे हो अवघे सर्वांग
हो हृदय तयांचे सोड सुखाचा संग
जळताना दे तू मंत्र जगा दयाचा
दुःखाच्या तिमिरा सदैव संपविण्याचा
चैतन्य अहिंसा येथे तूच मूर्त रूप हो ।। ३ ।।

गीतकार : शांताराम नांदगावकर

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# चांदण्याची छाया

चांदण्याची छाया कापराची काया
माऊलीची माया होता माझा भीमराया... ।।धृ।।

चोचीतला चारा आणि मायेचा उबारा
देऊनिया माय करी पिलाचा गुजारा
त्याच आई परी चिलापिला वरी
पंख पांघराया होता, माझा भीमराया... ।।१।।

नकाराची धूळ आज आकारास आली
वाळलेली वेल पुन्हा पावसात न्हाली
त्याच वेलीवरी अमृताच्या सरी
होऊनी झराया होता भीमराया...।।२।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

बोलू लागलीत मुलं विकासाची भाषा
पालवली आशा माझी लोपली निराशा
विकासाच्या आधी सात कोटी मधी
विकासाचा पाया होता भीमराया...।।३।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

झाला नवा नेता आता मलाईचे धनी
वामनच्या मनी येती जुन्या आठवणी
रामकुंडावरी झुंज दिली खरी
दगडगोटे खाया होता माझा भीमराया... ।।४।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

ती भीमाची काया ती भीमाची छाया
ती भीमाची माया मिळावी आम्हा
भीमाची भीमाई भीमाई रमाई
असावी आम्हाला हृदयी धरावा... ।।५।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

यशोधरे पाठी मुदा नदी काठी
सावित्रीची माया मिळाली आम्हाला
पाळणा घराची तशी थोर माया
मिळावी आम्हाला सदा पांघराया... ।।६।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

टाकून गेली आई वामनाची
तरी माय झाली धुळीच्या कणाची
जगाच्या आईचं पाडस पहा ते
हिरवळीत आता लागलं चराया... ।।७।।
माऊलीची माया होता माझा भीमराया...

गीतकार : वामन कर्डक

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# कोणी नाही भिमासारखा

ह्या संसारी दलितोद्धारी
महाउपकारी झाला अमुचा सखा
कोणी नाही भिमासारखा... ॥धृ॥

पडीक भूमी जीवन अमुचे
कुणी कसेही उडवीत होते
मालक झाला त्याच भूमीचा
भूषविले ते मंगल नाते
तन मन डसवून बीज रुजवुनी पिकवुनी गेला पिका ॥१॥

जातीयतेच्या अंधारातून
खंबीरपणे पुढे निघाला
करुनिया विद्येची साधना
विद्वत्तेचा पंडित झाला
थोर विधी तो घटनापती तो तया तुम्ही ओळखा... ॥२॥

बुद्धप्रणाली अंगीकारून
संघटनेची शक्ती मोठी
पंचशिलेने केले पावन
फिरलेले जन कोटी
हे विजयाचे कार्य तयाचे, आता तरी पारखा... ॥३॥

गीतकार: लक्ष्मण केदार

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# कोहिनूर भारताचा

होता तो भीम माझा कोहिनूर भारताचा
बुद्धाचा मार्ग त्याने दाविला तारणचा ।। धृ ।।

जिवंत आस उजळे होऊन दीपस्तंभ
प्रबुद्ध बौद्ध करण्या केला इथे आरंभ
उज्ज्वल भविष्यासाठी झिजला तो देह त्यांचा ।। १ ।।

पांडित्यपूर्ण शैली होती ती भाषणाची
सदैव दूरदृष्टी दृढनिश्चयी भीमाची
बाबांचा मानी पिंड बुद्धीच्या सागराचा ।। २ ।।

ग्रंथात ग्रंथरूपे राही अमर तो आज
विष्णू कधी ना लोपे प्रगल्भ भीमराज
विद्वान पूज्य ठरला, आदर्श गौतमाचा ।। ३ ।।

गीतकार : विष्णू डांगे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# बलिदानाचे कफन बांधुनी

बलिदानाचे कफन बांधुनी
झिजला तू भीमराया
मायपित्याहून उदंड केलीस
आमुच्यावरती माया ।। धृ ।।

अन्यायाची चीड घेऊनी
पेटवली तू धूळ
धुळीतून त्या तयार झाले
लाख लाख लाल
अन्यायाच्या पुढे कधी ना
झुकली त्यांची छाया ।। १ ।।

लाख जीवांच्या धगधगणाऱ्या
घेऊन सवे मशाली
जुन्या रूढींशी मांडलीस तू
जन्म-मृत्यूची खेळी
लाचारीतून दलितांची ना
जगेल आता काया ।। २ ।।

बहुजन हिताय, बहुजन सुखाय
तू सम्यक दृष्टीचा
तथागताचा अनुयायी तू
पुत्र जरी क्रांतीचा
येशील का रे पुन्हा कधी तू
अम्हास दर्शन द्याया ।। ३ ।।

गीतकार : राम मोरे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# भीमा तुझ्या नावाचा आम्हा अभिमान

तुझ्या नावाचा आम्हा अभिमान
भीमा तुझ्या नावाचा आम्हा अभिमान
तुझी प्रज्ञा अशी तुझ करुणा अशी
साऱ्या पतितांचा झालास दीपदान ।। धृ ।।

कुणी कधी दिला नाही जयाला निवारा
तया तूच झालासी मोलाचा सहारा
साऱ्या दीन-दलितांना कवळुनी उराशी
त्यांना हक्काची दिलीस तू जाण... ।। १ ।।

अज्ञानाचा अंधःकार होता सभोताली
किती कष्ट केले तरी माती हाती आली
स्वयंदीप होऊनिया उजाळिलेस तूच
सूर्याहून भासे अधिक तेजमान ।। २ ।।

आता तुझ्या तेजाच्या घरोघरी ज्योती
तुझ्या ज्ञानगंगेने मने पुण्य होती
दलितांच्या दीपा तू मानवता रूपा
तू जगी तूच सर्वशक्तिमान ।। ३ ।।

गीतकार : शांताराम नांदगावकर

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# आरती बाबासाहेबांची

जयभीम, जयभीम दलितांच्या नाथा,
माणुसकीच्या देवा तू अमुचा त्राता

रूढीची राक्षसीण घालितसे धाक
तूच दिली दुबळ्यांना लढण्याची हाक
तू धरिला समतेचा धगधगता पलिता, जयभीम ।।

माणसास हीन म्हणे तो नाही धर्म
माणसास दूर करी ते पापी कर्म
बुद्धाच्या करुणेचा तू नव उद्‌गाता, जयभीम ।।

घडल्यावरी दीनावर जुलूम जगी कोठे
नाव तुझे घेती आग उरी पेटे
कुणी न हीन, कुणी न शूद्र, उन्नत हा माथा, जयभीम ।।

लाख लाख हृदयातून दाटून ये भक्ती
शब्द तुझे मंत्र आम्हा पण तुझी शक्ती
प्रेरक तू तारक तू मुक्तीचा नेता, जयभीम ।।

गीतकार : मंगेश पाडगावकर

वरील गीत ऐकण्यासाठी
‘क्यूआर कोड’ स्कॅन करा.

# भीमवंदना

भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना !
आज घे ओथंबलेल्या अंतरांची वंदना !

दुमदुमे 'जयभीम'ची गर्जना चोहीकडे
सारखा जावे तिथे हा तुझा डंका झडे
घे, अता घे राहिलेल्या संगरांची वंदना !

कोणते आकाश हे ? तू अम्हा नेले कुठे?
तू दिलेले पंख हे.. पिंजरे गेले कुठे ?
या भरा-या आमुच्या.. ही पाखरांची वंदना!

कालचे सारे मुके आज बोलू लागले
अन् तुझ्या सत्यासवे शब्द तोलू लागले
हे वसंता, घे मनांच्या मोहरांची वंदना !

एक आम्ही जाणतो आमची तू माउली
एवढे आहे खरे आमुची तू सावली
घे अम्ही त्यांना दिलेल्या उत्तरांची वंदना !

जाळले गेलो तरी सोडले नाही तुला
कापले गेलो तरी तोडले नाही तुला
ही तुला उद्ध्वस्त झालेल्या घरांची वंदना !

तू उभा सूर्यापरी, राहिली कोठे निशा ?
एवढे आम्हा कळे, ही तुझी आहे दिशा !
मायबापा, घे उद्याच्या अंकुरांची वंदना !

धम्मचक्राची तुझ्या, वाढवू आम्ही गती
हा तुझा झेंडा अम्ही, घेतलेला सोबती
ऐक येणा-या युगांच्या आदरांची वंदना !

गीतकार : सुरेश भट

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर

दोनच राजे इथे गाजले, कोकण पुण्यभूमीवर
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर ।

रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक झाला
दलितांनी दलितांचा राजा महाडी घोषित केला
असे नरमणी दोन शोभले, दोन्ही वीर बहाद्दर
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर ।

शिवरायांच्या हातामध्ये तलवार भवानी होती
त्याच भवानीपरी भीमाच्या हाती लेखणी होती
निनादले दोघांच्या नावे कोकणातले डोंगर
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर ।

शिवरायाने रयतेचा जो न्यायनिवाडा केला
तोच निवाडा भीमरायाच्या घटनेमध्ये आला
प्रतापसिंघा परंपरेला दोन्ही मारती ठोकर
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर ।

दोनच राजे इथे गाजले,कोकण पुण्यभूमीवर
एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर ।

गीतकार : प्रतापसिंग बोदडे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा

करून करणी दिपवली धरणी । भयाण रात होती जेव्हा
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा । धृ ।

अन्यायाची सुरी, धरी माणूस माणसावरी
असली दादागिरी पाहुनी भीम पेटला उरी
तयार झाला रणी उतरला गर्जत सिंहाचा छावा । १ ।
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा

नरकातून ह्या निघा जगा माणूस म्हणुनी जगा
कपटी, जुलमी जगा त्यागुनी, पावन जीवन बघा
नाही हादरला सांगत फिरला धडाडीने गावोगावा । २ ।
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा

त्या भगवंतापदी लीन तो झाला सर्वाआधी
जन हे लक्षावधी टाकले नंतर ओटीमधी
हीन-दीनांना दुःखी जीवांना दिला सुखाचा हा ठेवा । ३ ।
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा

ह्या वस्तीला धनी हजारो वर्षे नव्हता कुणी
आला भीम-नरमणी टाकली नगरी ही बदलुनी
लक्ष्मणा ही करणी पाही जग सारं करतंय वाहवा । ४ ।
अंधेऱ्या वस्तीत भीमानं लावलाय दिवा

गीतकार : लक्ष्मण केदार

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# लई मजबूत भिमाचा किल्ला

तुम्ही किती बी लावा शक्ती, अन् किती बी लढवा युक्ती ।
तुम्ही करारं कितीही हल्ला,
लई मजबूत भिमाचा किल्ला ।।धृ।।

रक्त तीळ तीळ ते आटवून, किल्ला बांधून ठेवलाय त्यानं ।
किल्ल्यावरी ते निळं निशाण, फडकवलंय माझ्या भिमानं ।
बाबासाहेबांचा विजय असो
वाघ भित नाय मांजरीच्या पिल्ला ।।१।।

शूर भिमाचा खरा शिपाई, आता दलित राहिला नाही ।
किल्ल्यावर जर केली चढाई, घ्यावा समजून झालीच लाही ।
बाबासाहेबांचा विजय असो
करू मनगट तयाचा ढिल्ला
लई मजबूत भिमाचा किल्ला ।।२।।

करा गनिमी कावा तुम्ही, स्वारी परतून लावू आम्ही ।
जिरवू आम्हीच रे खुमखुमी, नाही आमच्यात कसली कमी ।
बाबासाहेबांचा विजय असो
नाद तिकडंच चालवा खुल्ला
लई मजबूत भिमाचा किल्ला ।।३।।

विजय नंदा बेकीची दरी, अशी पडली असली जरी
आपआपसात भांडती तरी, सेना किल्ल्याचं रक्षण करी
बाबासाहेबांचा विजय असो
लावू छातीला जय भीम बिल्ला
लई मजबूत भिमाचा किल्ला ।।४।।

गीतकार : विजयानंद जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# भीमा तुम्हा वंदना

भीमा तुम्हा वंदना
द्यावी सुबुद्धी आम्हा अजाणा

तनमन अमुचे चरणी अर्पण
भावपूर्वक धम्म समर्पण
मंगलमय बुद्धाचे दर्शन
घडविले रामजीनंदना

ना डगमगले कधी संकटी
रान उठविले उपाशीपोटी
लढले झिजले न्यायासाठी
लाजविले गंधित चंदना

चंद्र-सूर्य तळपती जोवर
कीर्ती भूवर राहील तोवर
नवकोटीचा वीर धुरंधर
तोडियले सहजी बंधना

गीतकार : लक्ष्मण केदार

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# माया भिमानं सोन्यानं भरली ओटी

काखेत लेकरू, हातात झाडनं, डोईवर शेणाची पाटी
कपडा न लत्ता अरे, खायाला भत्ता
फजिती होती माय मोठी,

माया भीमानं, माया बापानं
भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी

मुडक्या झोपडीले होती माय मुडकी ताटी
फाटक्या लुगड्याले होत्या माय सतरा गाठी
अरे, पोरगं झालं साहेब अन सुना झाल्या सायबीनी
सांगतात ज्ञानाच्या गोष्टी...

माया भीमानं, माया बापानं
भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी

सांगू सांगू मी केले, केले माय भलते कष्ट
नव्हतं मिळत वं खरकटं आणि उष्टं
असाच घास, दिला भीमानं
झकास वाटी वाटी
माया भीमानं, माया बापानं
अवं भीमानं ग, सोन्यानं भरली ओटी

माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
मवा उत्तम माय खेळता मेळता होता
तवा सारंगचा मुळीच पत्ता नव्हता
अग पूर्वीच्या काळात असंच होतं
बात माय नाही वो खोटी

माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी

काखेत लेकरू, हातात झाडनं डोईवर शेणाची पाटी
कपडा न लत्ता अरे, खायाला भत्ता
फजिती होती माय मोठी,

माया भीमानं, माया बापानं
भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी
माया भीमानं भीमानं माय सोन्यानं भरली ओटी

गीतकार : उत्तम फुलकर आणि सौजन्य संमदूर

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# जरी संकटाची काळरात होती

जरी संकटाची काळरात होती ।
तरी भीमराया तुझी साथ होती ।
तुझी तेवण्याची सुरुवात होती ।
प्रकाशात माझी पिढी न्हात होती...।। धृ ।।

पालवीत होते प्रकाशाचे गोळे ।
चालवीत होते तुझे दोन डोळे ।
प्रकाशाचे गाणे मनी गात होती ।
अशी फौज माझी पुढे जात होती...।। १ ।।

गणतीच माझी गुलामात होती ।
जिंदगीच माझी सलामात होती ।
तोडलीस माझी गुलामाची बेडी ।
अशी झुंजणारी तुझी जात होती...।। २ ।।

मला दावलेली तुझी पायवाट ।
जाहली आता विकासाची वाट ।
वदे आज वामन कालची तुझी ती ।
पेरणी उद्याच्या विकासात होती...।। ३ ।।

गीतकार : वामन कर्डक

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# भीमरायाचा मळा

लयास गेली युगायुगाची हीन-दीन अवकळा
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा ।। धृ ।।

रानमाळ असता भीमाने देह इथे झिजविला
शिंपडून रक्ताचं पाणी शिवार हा भिजविला
बहरली कणसं इमानी माणसं नाचती जोंधळा ।। १ ।।
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा

त्रिसरणाची झडप तयाला कुंपण पंचशीला
बुद्धं सरणं मार्ग एक हा जाण्यासाठी भला
मिटते भ्रांती, मिळते शांती, खुलते जीवनकळा ।। २ ।।
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा

बोधिवृक्ष हे डुलती कैसे बांधाबांधावरी
गोड लागते सावली तया जीवनाची भाकरी
मळा हा राखू फळे ही चाखू झरा बाजूला निळा ।। ३ ।।
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा

कोल्हेकुई ही कुपाकुपानं चाले बाहेरून
दुहीचा कुंदा वरती डोके काढितो आतून
हरेन्द्रासंग धरूया दोघं हाती एकीचा विळा ।। ४ ।।
पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा

गीतकार : हरेंद्र जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
‘क्यूआर कोड’ स्कॅन करा.

# प्रथम नमू गौतमा

शांतिदूताच्या वैभवशाली जाऊनिया आश्रमा
प्रथम नमू गौतमा तया हो, प्रथम नमू गौतमा ॥ धृ ॥

तथागताची तत्त्वप्रणाली
आचरणाची मुभा मिळाली
जीवनामध्ये आज बहरली, वैशाखी पौर्णिमा ॥ १ ॥

करू बुद्धमय उभ्या धरेला
बेत मनीचा नेत इरेला
रम्य चंद्रमा आज उदेला, इथेच थोडे रमा ॥ २ ॥

शुद्ध शिलाचं लेवून लेणं
बुद्धं शरणं गाऊ गाणं
करु या पावन अपुले जीवन, होऊन सारे जमा ॥ ३ ॥

गीतकार : राजस जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# बाबासाहेब आंबेडकर

हे खरंच आहे खरं, श्री भीमराव रामजी आंबेडकर
'बाबासाहेब आंबेडकर' नाव हे गाजतंय हो जगभर

महाविरोध कवटाळिला
सारा समाज सांभाळिला
कोटीकोटीचा उद्धार केला
शिरी बांधिला मानाचा शेला
अंधरूढीला गुलामगिरीला लावलिया कातर
'बाबासाहेब आंबेडकर' नाव हे गाजतंय हो जगभर

जातिभेदाच्या तोडिल्या तोफा
मार्ग सत्याचा दाविला सोपा
आम्हा बांधून ठेवलाय खोपा
बौद्ध धम्माचा टांगलाय सोफा
जाणून महती, सुखानं जगती दलितांची लेकरं
'बाबासाहेब आंबेडकर' नाव हे गाजतंय हो जगभर

भारताला जी होती हवी
अशी लिहिली घटना नवी
नवज्ञानाचा होता रवी
काय वर्णावी ही थोरवी
जोवर धरती हरेंद्रा कीर्ती राहील अजरामर
'बाबासाहेब आंबेडकर' नाव हे गाजतंय हो जगभर

गीतकार : हरेंद्र जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# छातीठोक हे सांगू जगाला

छातीठोक हे सांगू जगाला
छातीठोक हे सांगू जगाला,
असा विद्वान होणार नाही
कोणी झालाच विद्वान मोठा,
बुद्ध भगवान होणार नाही ।।धृ।।

दीन दुबळ्यांची उडवून सुस्ती,
चातुर्वर्ण्याची जिरवून मस्ती
कधी हरला ना ज्ञानाची कुस्ती,
असा पहिलवान होणार नाही ।।१।।

ज्याच्या घटनेवर चाले हे राज,
ज्ञान वैभव हे त्यालाच साज,
कुबेरालाही वाटावी लाज,
असा धनवान होणार नाही ।।२।।

ओझं पाठीशी हे उपकाराचं,
कसं फिटणार त्या युगंधराचं,
हे रमेशा त्या प्रभाकराचं,
का रे गुणगान होणार नाही ।।३।।

गीतकार : प्रभाकर पोखरीकर

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# नमोत्सू गौतमा

बुद्धं शरणं गच्छामी, धम्मं शरणं गच्छामी
संघं शरणं गच्छामी
ओम नमो तथागता नमोत्सू गौतमा
ज्ञानदीप चेतवी घालवी तमा ।। धृ ।।

सजय हृदय अभयदान देई तूच हे
अंतरंग शांत करीत जीवनात ये
सकल मलीन जाळण्यास भीमशक्ती दे
करी सशब्द, करी समर्थ हे नरोत्तमा ।।१।।

नवजीवन रूपधर्म येई अज्ञता
बुद्धदेव भारतास द्या प्रबुद्धता
विषसमान विषमता न अजून लोपली
द्या या जगास शिकवणीत दिव्य आपली
परम करूण लोचनात दाटवी क्षमा ।।२।।

धम्म शरण, संघ शरण लोकसाधना
शुद्ध चित्त नीती शुद्ध भावना
नवयुगात मिळवू या जनसमानता
हाच धम्म हेच ध्येय येई मानता
भीमरूप धरून तूच शिकविले आम्हा ।। ३।।

गीतकार : वसंत बापट

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# पिंपळाच्या पानावर

पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे
बोधिवृक्षाने कथन केले, ते चारित्र्य गौतमाचे

किती घोर तपस्या ती, देहाचे वारूळ झाले
बुद्धगया अजंठा ही, साक्षात वेरूळ आले
अष्टगाथा मंगलमय ते, पावित्र्य गौतमाचे
पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे...१

या सावलीत माझ्या, विश्वाची माऊली ती
ह्रदयात मानवाच्या, धम्मज्योत लाविली ती
जग जिंकूनी झाले, ते मित्र गौतमाचे
पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे...२

कधी केला नाही गर्व, ना वाद कधी केला
तरी देश आज म्हणतो, मी बुद्धाचा चेला
बुद्धाने बुद्ध पाहे, सचित्र गौतमाचे
पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे...३

लिहिले कुठेच नाही, हा माझा धम्म आहे
निर्वाणपदानंतर, या जगी स्तुप आहे
भिमदुतास कळले ते, सन्मित्र गौतमाचे
पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे...४

बोधिवृक्षाने कथन केले, ते चारित्र्य गौतमाचे..
पिंपळाच्या पानावर, पाहिले चित्र गौतमाचे

गीतकार : राजस जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुझाच गौतमा पडे प्रकाश अंतरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी, बुद्धं शरणं गच्छामि

कळ्या कळ्या फुले फुले तुला पुकारती
पहा तुझीच चालली नभात आरती
तुला दिशा निहारती यशोधरेपरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुझ्यामुळेच जाहला अखेर फैसला
दिलास धीर, तोडल्या आम्हीच शृंखला
आता भविष्य आमुचे असे तुझ्या करी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुलाच दुःख आमुचे तथागता कळे
तुझीच सांत्वना आम्हा क्षणोक्षणी मिळे
निनाद पंचशीलचा घुमे घरोघरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुझ्यामुळेच मार्ग हा आम्हास लाभला
तुझ्यामुळेच सूर्यही पुन्हा प्रकाशला
तुझेच सत्य यापुढे लढेल संगरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुझ्यासमान एकही नसे तुझ्याविना
सदैव यापुढे करू तुझीच वंदना
भरेल अमृतापरी तुझीच वैखरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी

तुझाच गौतमा पडे प्रकाश अंतरी
तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी, बुद्धं शरणं गच्छामि

गीतकार : सुरेश भट

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# मंगल दिन तो

श्रीबुद्धाच्या चरणावरती विजयादशमी दिनी
दीक्षा आम्हा दिली भीमाने मंगल दिन तो जनी ।। धृ ।।

मूळ जाळण्या विषमतेचे मार्ग असा वेचला
मानवतेचा अन् समतेचा धर्म नवा घेतला
श्री बुद्धाच्या महामंत्राचा निनादला तो ध्वनी ।। १ ।।

थोर भाग्य हे दलित जनांचे भीमरत्न लाभले
व्यथा तयांची दूर जाहली कार्य महा साधले
सोनं लुटुनी मांगल्याचे लोक हर्षले मनी ।। २ ।।

कितिक जाहले या अवनीवर संतमुनी ज्ञानी
करू न शकले आजवरी जे केले भीमाने झणी
उद्धरली नऊ कोटी जनता, रूढी मोडूनी जुनी ।। ३ ।।

गीतकार : गणपत शिंदे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# चंदनाची ही चिता

थांबा थांबा, जाळता का चंदनाची ही चिता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

राहिले कोंदण हे केवळ, गळुनी पडला नीलमणी
चंद्रावाचून काय शोभा, यायची तारांगणी
राहिले ना स्वर या कंठी, काय गावे संगीता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

विश्व हे दीन दुःखितांचे, जाहले सुने सुने
एक भीमावाचुनी वाटेल जग सारे उणे
ही चिता विझणार नाही, केला जरी सागर रिता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

जो जळत होता रविसम त्यास का अग्नी हवा
चंदनाला लाजवी कीर्ती सुगंधित ही हवा
मन फुलासम ज्याचे कोमल, त्यास सुमने अर्पिता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

काळवंडून आज गेल्या, आशेच्या दाही दिशा
ओ.., होऊनी हीनदीन हृदयाचे प्रतीक रडते निशा
अश्रू ढाळी भावनाही, हुंदका दे अस्मिता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

या प्रशांताला अशांत, करीतसे आक्रांत हा
झोपूद्या निर्वाण पथिका जाहला बहू श्रांत हा
नष्टविता का तया जो देतसे नवजीविता
पाहुद्या डोळा भरून मज भीम हा माझा पिता, थांबा थांबा ...

गीतकार : प्रशांत अंबादे

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# अरे सागरा

अरे सागरा !! अरे सागरा !!
भीम माझा येथे निजला, शांत हो जरा

दीनांसाठी कष्ट साहिले, माझ्या भीमाने
हक्क दिले मिळवुनी आम्हा, अति श्रमाने
सोडुनी ही गेली गाई, आपुल्या या वासरा
अरे सागरा !!

पाहून ऐट त्यांची, वैरी मनी लाज
घटनेचा शिल्पकार, माझा भीमराज
दीप विझला, नाही आजला, आता चमकणारा
अरे सागरा !!

बौद्धमय करीन भारत, हीच मनी आस
आनंदाने ठेवीन मी, या समाजास
स्वप्न तुटले, डोळे मिटले, आता ना सहारा
अरे सागरा !!

गेला सोडून आम्हा, पिता भीमराज
कल्याणकर्ता आमचा, राहिला ना आज
सोडुनी तो दुःखहर्ता, आजला या लेकरा
अरे सागरा !!

गीतकार : कल्याण जाधव

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.

## महामानवाचे महापरिनिर्वाण



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबर रोजी मुंबईत त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे १० तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दुःखाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. सुमारे दोन-तीन मैल लांबीची ही अंत्ययात्रा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (तेव्हाचा व्हिसेंट रोड), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी सुमारे सात तासांनंतर छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) जवळील स्मशानभूमीवर पोहोचली. 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागराने महामानवाला अखेरचा निरोप दिला.

### संदर्भ सूची


- आंबेडकरी लोकगीते - बबन लोंढे
- मोहळ - वामन कर्डक
- भीमगीते - वामन कर्डक
- एल्गार - सुरेश भट
- मराठी दलित कवितेचा इतिहास - डॉ. महेंद्र भवरे

# महापरिनिर्वाणदिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपापल्या घरुन अभिवादन करता यावे यासाठी चैत्यभूमी येथून थेट प्रक्षेपण सुविधा पुढील समाज माध्यमांवर (सोशल मीडिया) उपलब्ध.

  mybmcmymumbai  mybmc  mybmc

- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते आदींच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- बेवारस वस्तुंना स्पर्श करू नये व सदर बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरीता पोलीस नियंत्रण कक्ष, महानगरपालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.
- रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करू नये.
- समुद्र किनारी सजगता बाळगावी.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे. महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे / वापराचे पाणी वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**

## ■ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| व्यवस्था | दूरध्वनी (एसटीडी - ०२२) |
|---|---|
| महानगरपालिका नियंत्रण कक्ष | १९१६ |
| आपत्कालीन व्यवस्थापन | २२६९ ४७२५-२७ |
| महानगरपालिका अग्निशमन दल (भायखळा) | १०१, २३०८ ५९९१/२/४ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महानगरपालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | २२६२ ०४३३ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०१४९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| उप आयुक्त (परिमंडळ- २) | २४१५ ०४०० |
| सहाय्यक आयुक्त- 'जी उत्तर' विभाग | ६९५१ ७८०० / ६९५१ ७८०५ |
| जनसंपर्क अधिकारी | २२७५ ४०२५ |

## ■ इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/ २२०२ ४२४३ |
| मुंबई पोलीस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२०/ २२६२ १८५५ |
| मुंबई पोलीस उप आयुक्त (परिमंडळ- ५) | २४९२ ७३०८ / २४९७ ६१६० |
| वाहतूक पोलीस | २४९३ ७७५५ |
| वाहतूक पोलीस नियंत्रण कक्ष (वडाळा) | ८६५७० ४५०१३ किंवा २४१४ ६५३३ |
| बेस्ट वाहतूक 'टोल फ्री' क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१२ ४२४२ व २४१२ ४९९३/९०२११ २४२४२ |
| नागरी सुरक्षा दल | २२८४ ३६६७ |
| गृहरक्षक दल (होमगार्ड) मुख्यालय | २२८४ २४२३ / २२८४ ४१७१ |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | ४५१५ ४१३६ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७ / ९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई | २४१२ २३९६ / २४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**भीमा तुम्हा वंदना...**






- महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
- अभिवादन रांग
- बाहेर जाण्याचा मार्ग
- वैद्यकिय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
- छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे अनुयायांकरिता १८ युनिटची (१८०) फिरते शौचालये व रांगेतील अनुयायांसाठी ०४ युनिटची (४०) फिरती शौचालये
- २०० स्नानगृहे
- निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
- वैद्यकीय कक्ष
- माननीय भंतेजी निवास व्यवस्था
- रूग्णवाहिका
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
- पोलिस नियंत्रण कक्ष
- अन्न वाटपाची व्यवस्था
- पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
- कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
- विद्युत खांब
- तात्पुरते अग्निशमन केंद्र
- जीवरक्षक बोटीची व्यवस्था
- तात्पुरती शौचालये
- पाण्याची सुविधा
- दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
- माहिती कक्ष
- श्रीमान बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळ
- प्लाझा सिनेमा



# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०२४ रोजीची प्रस्तावित व्यवस्था





चैत्यभूमी (दादर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करताना महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्री. रमेश बैस, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार आणि इतर मान्यवर.



# महामानवाला अभिवादन करण्यासाठी जमलेला अथांग जनसागर




डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन (५ डिसेंबर २०२३)



छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा




१ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा




छायाचित्र प्रदर्शन केंद्र

(संग्रहीत छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०२३)

# बुद्धं सरणं गच्छामि , धम्मं सरणं गच्छामि,
# संघं सरणं गच्छामि..

६ डिसेंबर ५६ साली वेळ कशी ती हेरली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि

टपून बसला होता काळ कसा महापुरुषावरती,
देशो-देशी वार्ता पसरता हादरुन गेली ही धरती
काळजातील हंस हरपला, दर्याला आली भरती,
सूर्य बुडाला अंधार झाला म्हणून जनता ही झुरली
प्रगतीचे ते युगे दिनाची गुपित मागे सारली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि

देश हिताच्यासाठी लिहून गेला कायद्याची गाथा,
नमुन फक्त आयुष्यामध्ये बुद्धं चरणी तो माथा,
हरवली आई- हरपली माई, हरपली माता अन् पिता
वाली देशाचा निघून गेला कोण होईल तैसा आता
वैरण रातीची मर्जी धुरंधरावरती फिरली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि

सात कोटीचा प्रकाश गेला झाली जिवाची लाही
भीमापाठी या जगात आता वाली उरलेला नाही,
असे म्हणून दलित सारे रडू लागले ढाई-ढाई
चैत्यभूमीच्या ठिकाणी अश्रू गंगेसवे नयनी वाहू लागली,
असून कोटी पिले तरीही भीम मूर्ती नाकारली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामी

हर्ष कोपले, सुख लोपले, बाळाचे अन् आईचे
थोर उपकार देशावरती आहे भीमाच्या त्या शाईचे
महामानवाने ते केले कृत्याचे नवलाईचे
बुद्ध धम्माचे रोप लावूनी फुले उमलले जाईचे,
लढा देऊन गुलामगिरीला अंधश्रद्धा ती मारली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामी

शान जळता भारतभूची चितेवरती पाहिली
पाहताच क्षणी कालनंदनी श्रद्धांजली ती वाहिली
डबडबलेल्या अश्रुंनी महिमा त्यांची गायली
अमर झाली भीमाची कीर्ती डोळ्यांनी मी पाहिली
जाता जाता ह्दयी आमच्या मूर्ती बुद्धाची ती कोरली
दुष्ट काळाने भीमरायांची प्राणज्योत ती चोरली

बुद्धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामी ..

गीतकार : कालेनंद कुंभेफळकर

वरील गीत ऐकण्यासाठी
'क्यूआर कोड' स्कॅन करा.


| प्रशांत सपकाळे | अश्विनी जोशी | भूषण गगराणी |
| --- | --- | --- |
| उप आयुक्त (परिमंडळ-२) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक |

**तानाजी कांबळे**, जनसंपर्क अधिकारी, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथून प्रकाशित केले.
। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई. ।
**(ही पुस्तिका मोफत आहे)**
NS2778PRO-BMPP-71582-2024-25-1,00,000 COPIES